# लवासात आशियाना हौसिंगचा ज्येष्ठ नागरिकांसाठी गृहप्रकल्प

**पुणे, १९ फेब्रुवारी/ प्रतिनिधी**

आशियाना हौसिंग या बांधकाम क्षेत्रातील कंपनीने लवासा येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी उत्सव या नावाने खास गृहप्रकल्प योजना आखली आहे. या योजनेत सदनिका व व्हिलांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी कंपनीने सुमारे १३० कोटींची गुंतवणूक केली असून यामध्ये २५० सदनिका व २५० व्हिलांचा समावेश आहे. ५५ वया पेक्षा अधिक वय असणाऱ्यांसाठीच ही योजना आखण्यात आली आहे. एकुण ३१ एकर जागेवर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे, असे कंपनीचे वरिष्ठ अधिकारी मनोज त्यागी यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले. ■